लोकमत

# अंतिम सत्र परीक्षांबाबत २० जूननंतर निर्णय

मुंबई : राज्यातील कोरोनाच्या संसर्गाबाबत २० जून रोजी पुन्हा आढावा घेऊन त्यानंतरच अंतिम वर्षाच्या अंतिम सत्रातील परीक्षा घ्यायच्या की नाहीत, याबाबत निर्णय घेतला जाईल, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यार्थ्यांना दिली.

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या नवमहाराष्ट्र युवा अभियानातर्फे आयोजित 'राज्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे आगामी शैक्षणिक वर्ष व समस्या' या विषयावर त्यांनी फेसबुकद्वारे संवाद साधला. अनेक स्वायत्त व खासगी विद्यापीठे विद्यार्थ्यांच्या परीक्षा घेण्याच्या तयारीत असल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी यावेळी केल्या. त्यावर आपण उद्याच सर्व विद्यापीठांच्या प्रशासन व कुलगुरुंशी संवाद साधणार आहोत. यूजीसीच्या निर्देशांप्रमाणे, शासन धोरणानुसारच स्वायत्त, खासगी विद्यापीठांना परीक्षांबाबतचे धोरण राबवावे लागेल. लवकरच निर्णयही निर्गमित केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

ज्या विद्यार्थ्यांनी शुल्क भरले आहे, मात्र परीक्षा झाली नाही त्यांच्या शुल्काबाबत काय निर्णय घ्यावा, यासंदर्भात येत्या २ दिवसांत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलगुरुंशी चर्चा करून निर्णय जाहीर करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

## भविष्यात ऑनलाइन शिक्षण

भविष्यात ऑनलाइन शिक्षणासाठी उच्च व तंत्रशिक्षण विभाग प्रयत्नशील राहणार असल्याचे मंत्री सामंत यांनी म्हटले. अनेक विद्यापीठे यादृष्टीने पावले उचलत असून काही ऑनलाइन स्टुडिओ उभारुन व्हर्चुअल लेक्चर्स कसे घेता येतील, आपले सॅटेलाइट चॅनेल कसे सुरु करता येईल, यादृष्टीने प्रयत्न करत असल्याचे सांगितले. नेट कनेक्टिव्हिटीचा अडथळा लक्षात घेता ग्रामीण विद्यार्थ्यांना एकाच ठिकाणी व्हर्च्युअल रुपात ऑनलाइन क्लासेसचा प्रयत्न राहील, असे त्यांनी सांगितले.

# गैरहजर विद्यार्थ्यांचे काय ?

## सेकंड सेमिस्टर; नापास विषयांची परीक्षा द्यावी लागणार

**सकाळ वृत्तसेवा**

**कोल्हापूर, ता. ११ : फर्स्ट इयरला तीन विषय सुटले, दुसऱ्या सेमिस्टरला अब्सेंट, सेकंड इयरच्या थर्ड सेमिस्टरचे सर्व विषय सुटलेत; मात्र फोर्थ सेमिस्टरला अब्सेंट होतो, अशी कारणे सांगणारे विद्यार्थी भलेही पुढच्या वर्गात ढकलले जातील. मात्र, नापास झालेल्या विषयांची परीक्षा पुढे द्यावी लागणार असल्याने त्यांचे टेन्शन वाढले आहे. पुढच्या वर्गातील विषयांसह नापास विषयांच्या अभ्यासाचा ताण त्यांना सहन करावा लागणार आहे.**



कोरोनाच्या प्रादुर्भावाने बारावीचा इतिहास व भूगोलचा पेपर रद्द करण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागला. पदवी, पदव्युत्तर परीक्षा घेण्याचा निर्णय अधांतरी होता. त्याचा निकाल उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी लावताना प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षाच रद्द केल्या. पुढच्या वर्गात ढकलले गेल्याचा आनंद विद्यार्थ्यांत जरूर आहे. मात्र, ज्यांचे फर्स्ट व सेकंड सेमिस्टरचे मिळून केवळ दहापैकी चारच विषय सुटले आहेत, त्यांना पुढच्या वर्गात प्रवेश मिळेल का किंवा फर्स्ट सेमिस्टर देऊन सेकंड सेमिस्टरला गैरहजर विद्यार्थ्यांचे काय होणार, असे प्रश्न विचारले जात आहेत. शासनाने भलेही पुढच्या वर्गात म्हटले असले तरी अशा विद्यार्थ्यांची धाकधूक आहे. पुढच्या वर्गात ढकलले गेलो तरी अभ्यासाचा ताण राहणार, ही चिंताही विद्यार्थ्यांत आहे. सप्टेंबरनंतर शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर परीक्षेचे वेळापत्रक कसे असेल, याचीही धास्ती आहे.

**“ विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्यानंतर फोटोकॉपी, रिव्हेरिफिकेशन, रिव्हॅल्युएशनसाठी अर्ज आले होते. त्यातील अनेक अर्ज निकाली निघाले आहेत. एक हजारावर अर्जांचे काम अंतिम टप्प्यात आहेत. कोरोनामुळे ते होऊ शकलेले नाही. संचारबंदी उठताच ते पूर्ण होईल. तसेच ज्यांना गुण वाढवायचे आहेत, त्यांचीही परीक्षा घेणार आहोत.**

**- गजानन पळसे,**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ.

# पदवी, पदव्युत्तरच्या अंतिम वर्ष परीक्षाही रद्द करण्याची मागणी

मुरगूड (पुढारी वृत्तसेवा) : 'यूजीसी'कडून प्रथम व द्वितीय वर्षाच्या परीक्षांबाबत नियमावली बनवलेली असून अंतिम वर्षाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर केल्याचे समजते. या सर्व परीक्षा विद्यापीठ कोणत्या वातावरणात व कशा पद्धतीने घेणार याचा मानसिक ताण पालकांच्यावरही पडला आहे. तरी कोरोनाची पार्श्वभूमी लक्षात घेता पदवी व पदव्युत्तरच्या अंतिम वर्षाच्या सर्व परीक्षा रद्द कराव्यात अशी मागणी मंडलिक युवा प्रतिष्ठनचे अध्यक्ष वीरेंद्र मंडलिक यांनी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू यांच्याकडे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, प्रथम व द्वितीय वर्षाच्या नियमावलींप्रमाणे अंतिम वर्षाच्या परीक्षांबाबत नियमावली बनवून त्यांचा निकाल प्रथम, व्दितीय वर्षाच्या गुणांकावर आधारित श्रेणीनिहाय करावा. अंतिम वर्षे हे विद्यार्थांचे निकाली वर्ष असले कारणाने या वर्षात विद्यार्थी जास्तीत जास्त अभ्यास करतात. त्यामुळे श्रेणीनिहाय गुणांकन होत असताना विद्यार्थ्याला ५ ते १० टक्के जादा मार्क देणेबाबतचा विचार व्हावा. तसेच परीक्षा रद्द करून विद्यार्थी व पालक यांचेतील वातावरण तणावमुक्त करावे, अशी मागणीही मंडलिक यांनी केली आहे.

# विद्यापीठात कायमस्वरूपी करोना टेस्टिंग लॅब

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठात करोना संसर्ग तसेच साथीच्या आजारांचे निदान करणारी कायमस्वरूपी टेस्टिंग लॅब स्थापन करण्यात येणार आहे. येत्या महिन्याच्या अखेरीस लॅब कार्यान्वित करण्याच्या हालचाली सुरू झाल्या असून या संदर्भातील फेरप्रस्ताव जिल्हा प्रशासनास सादर करण्यात आला आहे. यासाठी चार सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली असून उपकरण खरेदीची प्रक्रिया लवकरच सुरू करण्यात येणार आहे.

करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठाने कायमस्वरूपी टेस्टींग लॅब उभारण्याबाबतचा प्रस्ताव कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी जिल्हा प्रशासनाला सादर केला होता. पालकमंत्री सतेज पाटील यांच्यासह जिल्हाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत शुक्रवारी बैठक झाली. जिल्हा प्रशासनाकडून फेरप्रस्ताव सादर करण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी टेस्टींग लॅबचा प्लॅन सादर करण्यात आला.

इंजिनिअरींग सेक्शनला सेंट्रल फॅसिलिटी सेंटर (सीएफसी) सेंटर येथे होणाऱ्या लॅबसाठी आवश्यक त्या तरतूद करण्याच्या सूचना देण्यात आल्या. बायोकेमिस्ट्री विभागाच्या डॉ. जे.पी. जाधव यांच्यासह चार जणांची समिती नेमण्यात आली.

# सामाजिक चळवळी मजबूत व्हाव्यात

कोल्हापूर टाइम्स टीम

कोणत्याही संकटाचा सामना करण्यासाठी सामाजिक चळवळी मजबूत केल्या पाहिजेत तरच सामाजिक प्रश्न सोडवणे सुलभ जातील, असे प्रतिपादन विचारवंत किशोर बेडकीहाळ यांनी केले. शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र अधिविभागाच्या सुवर्णमहोत्सवाची

## वेबिनारमध्ये किशोर बेडकीहाळ यांचे प्रतिपादन

वर्षानिमित्त राज्यशास्त्र विभाग व नेहरू अभ्यास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाइन राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ. भारती पाटील होत्या.

वेबिनारद्वारे राज्यशास्त्र परिषदेचे २६ वे अधिवेशन पार पडले. चर्चासत्रामध्ये 'महाराष्ट्रातील नव- सामाजिक चळवळी (१९८०-२०२०)' हा विषय मुख्य स्वरुपात होता.

प्रास्ताविक राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. डॉ. रवींद्र भणगे यांनी केले. यावेळी आयोजित के. के. कावळेकर व्याख्यानमालेत प्राचार्य, पी. डी. देवरे (नाशिक) यांनी 'सामाजिक चळवळ व राज्य आणि आताची परिस्थिती' याविषयी विवेचन केले. सत्राचे अध्यक्ष प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनी 'करोना संकटाच्या काळात वेगवेगळ्या सामाजिक चळवळीची दिशा' याबाबत विवेचन केले.

वेबिनारचे शेवटचे सत्र पेपर वाचनचे आयोजित केले होते. या सत्रात ऑनलाइन पद्धतीने १७ सदस्य सहभागी झाले. शोधनिबंध सत्रात भारतातील नवसामाजिक चळवळ, करोना संकट, नेहरुवादी नव-सामाजिक चळवळी, सहकार चळवळ व शैक्षणिक चळवळी या विषयांतर्गत ५२ सहभागी सदस्यांनी संशोधन पेपरच्या सारांशाचे वाचन केले.